7 मार्च 2014

# राष्ट्रवादासह क्रिकेटचा खेळ

**-अरुण जेटली**
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

1999 चे वर्ष होते जेव्हा कारगिल युद्ध सुरु होते. इंग्लंडमध्ये विश्वकप क्रिकेट खेळ चालू होता. मी योगायोगाने उन्हाळी सुट्टी घालविण्यासाठी आपल्या परिवारासह तिथे गेलो होतो. आम्हाला क्रिकेट मॅच बघण्यासाठी एका स्टेडियममधून दुस-या स्टेडियममध्ये जावे लागत होते. भारतीय संघ सेमी फायनलच्या आधी बाहेर पडला होता.

पाकिस्तानी क्रिकेट टीम बरोबर भारताची पहिली मॅच मँचेस्टर मध्ये ओलड ट्रैफर्ड येथे खेळली गेली होती. कारगिल युद्ध चालू राहण्याबरोबरच भारत-पाक क्रिकेट मॅच चे आणखी महत्त्व वाढले गेले होते. स्टेडियम मध्ये तणाव होता. बरेचसे प्रेक्षक भारतीय रंगामध्ये आले होते किंवा त्यांनी पाकिस्तानी टी-शर्ट घातलेली होती. दोन्ही देशाचा राष्ट्रीय ध्वज हजारो संख्येत फडकत होते. भारतीय मूल असलेल्या काही युवकांनी मला ओळखले आणि आम्ही भारतीय संघाच्या विजयाच्या शक्यतेसंदर्भात बोलू लागले. अधिकतर लोकांनी मला सांगितले त्यांच्याजवळ ब्रिटीश पासपोर्ट आहे आणि ते ब्रिटीश नागरिक आहेत. त्यांच्यामधील काही गुजराती होते, ज्यांचे परिवार युगांडा आणि केनिया मधून आलेले होते. मी त्यांना असा प्रश्न विचारला की, क्रिकेट मॅच मध्ये आपण कोणाला प्रोत्साहित कराल आणि एका स्वरात त्यांनी सांगितले निश्चितपणे भारताला, परंतु इग्लंड अन्य कोणत्या देशाबरोबर खेळत असता तर आम्ही त्याला प्रोत्साहित केले असते. मला लॉर्ड स्वराज पॉल यांची गोष्ट आठवली की, ते नेहमी भारताला प्रोत्साहित करतात आणि जर इंग्लंड आणि भारत खेळत असेल तर त्यांना विजेत्या संघाच्या बाजूने राहण्याचा विशेष लाभ त्यांना मिळतो.

मी वरील गोष्टींचा उल्लेख यासाठी केला की, राष्ट्रवादा बरोबर खेळ किंवा राष्ट्रवादा बरोबर क्रिकेट हा खेळ कोणत्याही व्यक्तीची राष्ट्रीय ओळख असू शकते. खेळप्रेमी होण्याच्या नात्याने कोणत्याही एका महान खेळाडूच्या गुणांची प्रशंसा करु शकतो मग त्यांची नागरिकता कोणतीही असो. त्यांच्यापैकी काही आनंद घेत असतात. परंतु प्रतिस्पर्धात्मक क्रिकेट मध्ये राष्ट्रवादाची भावना आपल्याला आपल्या राष्ट्रीय संघाकडे खेचून घेते. मी विश्वकप फुटबॉलमध्ये जगभरातील प्रशंसकांना आपल्या राष्ट्रीय टीमचा उत्साह वाढविताना पाहिले आहे.

भारत-पाकिस्तान क्रिकेट संदर्भात महान क्रिकेटराच्या खेळासंबंधी गुणांची प्रशंसा करणे चुकीचे नाही आहे मग त्यांची राष्ट्रीय सीमा कोणतीही असो, परंतु जेव्हा काही लोकांचा ओळखीचा गुट जाणून-बुजून पाकिस्तानाच्या विजयाचा जल्लोष साजरा करतो, तेव्हा त्याला पाकिस्तानाच्या खेळासंबंधी गुणांची स्तुती करण्याचा कोणताही निरागस प्रकार मानू शकत नाही. याप्रकारच्या कारवाईत कोणते तरी राजकीय वक्तव्य असते. मुद्दा हा नाही आहे की अशाप्रकारच्या युवकांच्या विरोधात कोणती अपराधिक कारवाई करायला पाहिजे अथवा नाही आणि जर केली जाऊ शकते तर कायद्याच्या कोणत्या कलमाअंतर्गत. मुद्दा हा आहे की जाणून-बुजून अशाप्रकारचे भाव-प्रदर्शन काय राजकिय संदेश देण्यासाठी केले गेले.

जाहिर आहे की अशाप्रकारच्या भाव प्रदर्शनाने अनेक लोकांच्या डोक्यात शंका निर्माण केली आहे. त्यांनी मनोवैज्ञानिक बाधा उभी केली आहे ज्यामध्ये काही अनावश्यक लोक उत्तेजित होतात. काय त्यांना या गोष्टीचा आभास आहे की ते आपल्याच समुदायातील लाखो चांगल्या लोकांना कोणत्या स्तरावर नुकसान पोचवतील, जे होऊ शकते की ते आपले अनुभव सांगणार नाहीत. युक्तीवाद असा की, यामुळे एका खास वर्गाच्या लोकांमध्ये मतभेदाची भावना दिसून येते त्याला मी सहमत नाही आहे. याच्या विपरित हे त्यांना राष्ट्रीय मुख्यधारेपासून दूर करतात. भारतातील सर्व चांगली माणसे खासकरुन समुदायातील सदस्यांना अशा भटकलेल्या युवकांना समजावले पाहिजे की जे काही त्यांनी केले त्यामुळे त्यांनी स्वतःला, आपल्या समुदायाला आणि देशाला हानी पोचवली आहे. हा हरलेला खेळ आहे.